# 'कोकणी लोकसाहित्यातील लोकसंस्कृती'

प्रा. डॉ. नामदेव विठ्ठल गवळी
मराठी विभाग, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी,
जिल्हा सिंधुदूर्ग, महाराष्ट्र.

कोकणप्रदेशाला प्राचीन काळी अपरांतक या नावाने ओळखले जात असे. कोकण हा प्रदेश मूलतः डोंगराळ, खाचरांचा, सातशे ते आठशे किलोमीटरची समुद्रकिनारपट्टी लाभलेला प्रदेश आहे. इथले कृषीजीवन आणि सागरी जीवन हे प्राधान्याने निसर्गधिष्ठीत असलेले दिसते. साहजिकच, इथला माणूस, इथल्या परंपरा जोपासत आपले जीवनव्यवहार पार पाडताना दिसतो, या जीवनव्यवहारांना इथल्या सामाजिक संकेतांचे, रूढीपरंपरांचे आणि निसर्गाचे संदर्भ प्राप्त झालेले आहेत. कोकणभूमी ही हिमालय प्रदेश आणि केरळप्रमाणे देवभूमी म्हणून ओळखली जाणारी श्रद्धाळू भूमी आहे. बारा महिने, बारा सण साजरे करणारी येथे लोकसंस्कृती आहे. म्हणून येथे देवस्थानांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. गावाची गावरहाटी या देवस्थानच्याच केंद्रस्थानी राहिलेली आहे. म्हणूनच या भागाचे गाव आणि देव हे नाते अतूट आहे. ज्या दक्षिण कोकणात ही लोकसंस्कृती अधिक प्रकर्षाने तेजोमय झालेली दिसते, त्याच दक्षिण कोकणामध्ये सिंधुदूर्ग जिल्हा हा केंद्रस्थानी राहिलेला आहे. कोकणात अन्य जिल्हापेक्षा बोली जशी वेगळी तशी आहार पध्दती वेगळी. सांस्कृतिकदृष्ट्या येथीलो दहीकाले, देवदेवळे वार्षिकोत्सव व लोककला येथील लोकजीवनाने स्विकारली आहे, नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या या मुलुखात प्रत्येक गाव सुंदर आहेच. सोबत येथील गावरहाटीत नैतिक जीवन हेच सर्वश्रेष्ठ आहे ही कल्पना 'न्याय नीती व धर्म' या तत्वात स्विकारली जावून नैतिकतेचा वस्तुपाठ ग्रामलोकसंस्कृतीचा मुख्य गाभा आहे.

कोकणाच्या सांस्कृतिक-सामाजिक जीवनाचे केंद्र म्हणजे येथील मंदिरे आणि प्रार्थनास्थळे. मंदिरदेवतेच्या साक्षीने इथले बहुतांश सांस्कृतिक जीवन फुललेले दिसते. येथे प्रत्येक सांस्कृतिक घटकाचे स्वतंत्र अस्तित्व-ओळख आहे. ग्रामदेवता, त्यांच्या परिवार देवता, कनिष्ठ देवता आणि त्यांना प्रसन्न करून घेण्यासाठी केलेले पारंपरिक विधी, उपाय, प्रथा हेही येथील खास वेगळेपण, कोकणी माणूस याबाबत अत्यंत हळवा आणि कडवा आहे.

"कोकणातील कृषिसंस्कृतीत मातृदेव आणि अनार्यांच्या देवतांवरचा विश्वास अधिक दृढ असलेला दिसतो. वनदेवता तुळस, ग्रामदेवतांमधील सातेरी, भद्रकाली, भवानी, महालक्ष्मी, भगवती या मातृदेवता तसेच शंकराची विविध रूपे ग्रामदैवते म्हणून येथे सर्वमान्य झालेली दिसतात."[१] गिरोबा, बहिरोबा, सिद्धेश्वर, बांदेश्वर, क्षेत्रपालेश्वर, रामेश्वर अशा विविध रूपात हे शिवतत्व भरून राहिले, असे मानले जाते. शिमगा या सणात शिवाच्या गणांचे रूप इथल्या लोकसमुदायात संचारते. हरहर महादेवाच्या घोषणांनी सारी गावे दुमदुमत असतात. गणपतीचेही मूळ अनार्य रूप येथे पहावयास मिळते. गणेशपूजनानंतर उंदरालाही या संस्कृतीत शेतात नैवेद्य म्हणून भोजन ठेवले जाते. मानवी समूहाच्या निर्मितीपासून ग्रांमदेवतांचे अस्तित्व निर्माण झाले. गावच्या वेशी, तिठे, कोपरा, चव्हाटा, राया येथे या देवतांचे स्थान ठरले . तांदळा, चौथरा, पाषाणांची रास, कुठे एखादे निशाण आदी स्वरूपात ग्राम-देवतांचे पूजन आजही कोकणात पाहावयास मिळते. "गांगो, रवळनाथ, भैरव, भूतनाथ, महाकाली, दुर्गा, भगवती, भावई, सातेरी, माऊली, पावणाई, जाखाई, रानाई, विठाई आदी नावांनी या देवता पूजल्या जातात."[२] या देवतांबरोबर श्रीगणेश, शिव, श्रीकृष्ण, श्रीराम, पांडुरंग, सुर्य आदी दैवत-कुलदैवते, उपास्य-दैवत्ते मानली जातात. कोकणी माणसाच्या घरातील देवघरात या देवतांच्या प्रतिमा, छायाचित्रे आढळतात. काही घराण्यांतून 'कुलवंस' म्हणून केवळ असोल्या नारळाची पूजा होते.

कोकणात गावच्या जीवमात्रांचे संरक्षण करणाऱ्या ग्रामदेवतांचे येथे मोठे प्रस्थ आहे. या देवता गावातील प्रत्येकाच्या सुखदुःखाशी जवळीक साधतात आणि जीवनातील छोट्यातील छोटी संकटे, दुःखे दूर करतात, असा असीम विश्वास इथल्या माणसाला आहे.

याच भावनेतून या देवतांना राजी करण्याचे अनेक पारंपरिक उपाय केले जातात. एरवी व सणजत्रादी उत्सवाच्या निमित्ताने 'कौल घेणे', 'गाऱ्हाणे घालणे' हाही या भूमीचा खास विशेष. इथल्या उत्सवाचे स्वरूप धार्मिक आणि सामाजिक असे दुहेरी असते, महाभिषेक, महानैवेद्य, पुराण, कीर्तन, आरत्या हा भाग धार्मिक; तर पालखी, रथोत्सव, दयकाले-दशावतार, ठाकर, लळीत, पिंगुळी इ. लोककलांचे सादरीकरण इत्यादी प्रथा सामाजिक जीवन ऐक्याचे साधिक वृत्तीचे प्रतीक. या सणउत्सवांत प्रथम गाव वसवणाऱ्या घराण्याचा मान आवर्जून राखला जातो. देवाची पूजा, पालखी उचलणे, देवाला नारळ-सुपारी वाहणे, ढोल वाजवणे या आणि अशा कितीतरी देवकार्यांत त्या त्या जमातीच्या घराण्याचा मान देऊन उत्सवाला सुरुवात होते. हा परंपरागत अलिखित नियम पिढ्यान्पिढ्या पाळला जात आहे. शिकार करणे आणि ती सर्वांनी वाटून खाणे ही संस्कृती इथल्या लोकसमुदायाने जपलेली बाब खूप आधीच्या वनसंस्कृतीचे आणि टोळीजीवनाचे संदर्भ साकार करताना दिसते. ही शिकार ग्रामदेवतेसमोर शिजवून सर्वांना भोजन म्हणून वाटली जाते. देवाचा प्रसाद म्हणून त्याचे सेवन करणारा हा लोकसमूह थेट अनार्य संस्कृतीचे अवशेष टिकवून ठेवलेला समाज आहे.

संस्कृतीचे प्रकट व्यवहार म्हणून कोकणांतील विधींचा विचार करता येतो. विवाहविधी, सुफलीकरण व वंशभरण विधी, वनदेवीचा मांड भरवून दक्षिण कोकणात धाला हा विधी केला जातो. कणसरीपूजन किंवा नर्व करणे हा धान्यपुजेचा विधी कोकणातील प्रत्येक घरी केला जातो. याशिवाय देवबारस, वाढवाळ हे वृद्धिविधी व अशुभ निवारणाविधी हे इथल्या लोकसंस्कृतीमधील महत्त्वाचे विधी म्हणून ओळखले जातात. विविध विधींबरोबर कोकणातील कृषिसंस्कृतीमध्ये नागपंचमी, गोकुळाष्टमी, गणेशचतुर्थी, देवीपूजन, दसरा, वसूबारस, पाडवा, शिमगा, संक्रांत असे अनेक सण साजरे केले जातात. हे सण सार्वजनिक असले तरी कोकणात या सणाउत्सवांना खास कोकणी संस्कृतीचे संदर्भ प्राप्त झाले आहेत. सिंधुदूर्ग जिल्ह्यातील नारूर गावचा खापरोत्सव, जैतीर उत्सवात लोककथा आहे. वालावलचा दादरा पोहचविण्याचा विधी, जैन संस्कृती लोप पावणे हे दर्शविते. नागवे-नागेश्वराच्या देवळातील नवस फेडणे एक विलक्षण अनुभव, जमीन केसाने सारविली जाते. मानसी वेंगुर्ला येथील बत्तीची जत्रा, जत्रेच्या वेळी किंवा इतर दिवशी त्या मार्गाने गाडीने जाताना हॉन न वाजविणे, साळ दोडामार्ग येथील गोटा केलेल्या डोक्यावर कलश घेऊन निखाऱ्यावरून धावणे, बिळवस सातेरी मंदिरात सिमा बांधणी कार्यक्रम, वेताळ मंदिरातील तीर्थकारांचे वेताळात रूपांतर होणे, पावशीच्या सातेरीला निळीचा लेप, कोईल गावात गणपती न पूजणे, आचरे व शिराळे गावची गावपळण, कुर्ली गावातील पाटलांचा बारशीला म्हाळ, एकवीस दिवसाचा खवळे गणपती अशा रुढी व प्रथांचे वेगळेपण हे लोकमानसातील लोकसंचित आहे. वाडवडिलांचा सन्मान, पुत्रधर्म यांचे नितीसंकेत आहेत. शब्द पाळणे, अतिथि स्वागत, कुटुंबाच्या पारंपरिक रुढीचे जतन या विषयी लोकमत जागृत आहे. नीतीकल्पना, सत्वपरिक्षा न्यायनिवाड्यांच्या स्त्री मनांवर जबरदस्त पगडा आहे.

"कोकणातील लोककला दशावतार, ठाकर लोककला, चित्रकथी, एकनाथ व भावार्थ रामायणाचा पगडा, ललिते व नाथांच्या भारूडाचा संबंध, गाऱ्हाण्यामधील नामावली, मालवणी म्हणी, रोंबाट, देसरुढ, गावपळण, बारापाचाचा गावगाडा, दहिकाले या सर्वांतून एक भव्य परंपरेचा पट उलगडला जातो."[३] तरंग संस्कृती कौलपद्धती, नागप्रदेश, भुताखेतांचा प्रदेश, कुलाचार, कुलधर्माचा प्रदेश, नवस, शाकाहारी, मांसाहारी, एकदशम्या, सप्ताह, दिंड्या, जत्रोत्सव यातून एका परंपरेने नटलेल्या एका अदभुत सृष्टीचा प्रावास घडतो. मालवणी मुलुखातील ग्रामदैवत व्यवस्थेत लोकसांस्कृतिक परंपरा व या मुलुखाची वेगळी वैशिष्टे आहेत. प्रत्येक व्यक्ती ही समाजाची घटक असते आणि त्या समाजातील चालीरीती, लोकभ्रम,समाजव्यवस्था, नीती-अनीती, देवदेवता इत्यांदीचा परिणाम लोकजीवनावर होत असतो.येथील ग्रामदेवतानाही शेकडो वर्षाची परंपरा आहे. येथील धार्मिक संस्कृती लक्षात घेता भूमी, झाडापेडात, दगड्धोड्यांत असलेल्या परमेश्वरी शक्तीचा मिलाप घडवून आणण्याचा गावरहाटीत निश्चय झाला.याच ग्रामदेवतानी येथील समाजव्यवस्था एकसंघ राखण्याची महत्त्वाची भूमिका बजावली. कोणत्याही राजसत्तेपेक्षा ग्रामदेवता सत्ता श्रेष्ठ आहे हि भावना दृढ झ ाली.आपल्या सर्व जीवनमूल्याची गा-हाणी देवतांसमोर येऊ लागली,देशस्तरावरील देवस्थानाच्या परंपरा आणि रुढी यांचा विचार करता कोकणात गाव व समाजाला एका बैठकीत नांदवणारी ग्रामदेवता श्रेष्ठत्वास ठरली. हीच ग्रामदैवते सामाजिक न्यायनिवाड्याची केंद्रस्थाने ठरली. मंदिराचा चौखांबा म्हणजे चार वेद मानले जावून मूळ पायाचा चौखांबा आजही अबाधित आहे. या पध्दतीला कोणत्याही राजवटीत आव्हान दिले गेले नाही. चौखांब्यातील अंतिम न्याय म्हणजे देवळाच्या घंटेखाली

निवाडा करणे होय, लोकसंस्कृतीत हे सर्वोच्च न्यायालय होय.

"मालवणमधील सुप्रसिद्ध आंगणेवाडीची यात्रा गावातील मंडळीने शिकार करून आणल्यावर सुरू होते. डाळापविधी होतो. देवीचा कौल घेऊन शिकार केली जाते. अनार्य संस्कृतीचे हे अवशेष आजही या विधीतून पहावयास मिळतात."[४] शेती आणि शिकार याबरोबर मासेमारी केली जाते. मासे मारण्याची शेलूक, शेंडी, येण आखली (तंतूपासून विणलेली जाळी) अशी अवजारे वापरली जातात. गरीने गरवूनही मासे पकडले जातात. नद्या, तलाव, समुद्र या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मासेमारी होते. या शिवाय कृषिजीवनात अनेक प्रकारची अवजारे वापरली जातात. जमीन सपाट करण्यासाठी पेटणा, घुमस अशी अवजारे दिसतात. आधुनिक काळात लोखंडी नांगर किंवा ट्रॅक्टर वापरण्यासाठी पद्धत आली आहे. लोकसंस्कृतीवर आधुनिकतेचे आक्रमण सतत होत असतेच.

कोकणातल्या सणाउत्सवांतून वनसंस्कृती आणि पर्यावरणाविषयीची कृतज्ञता व्यक्त होतो. धालो, कणसरीपूजन वाढवाळ या सा-याच विधींमधून वनसंस्कृतीचे अवशेष बीजरूपाने अस्तित्वात असलेले दिसतात. या सणाउत्सवांतून आणि विधिविधांनातून समूहाभावाचे दर्शन घडते. खेळ, भोजन, शिकार व काही विधी सर्व समाज एकत्र येऊन करतो. न्याय, सत्य, धर्मचरण या बाबतीत पाप-पुण्याच्या कल्पना या समूहांना नियंत्रित असतात, असे लक्षात येते. कोकणातील कृषिसंस्कृतीमध्ये शकुन-अपशकुनांचे, लोकविचारांचे विश्व पहावयास मिळते. दृष्टीबाधा आणि त्यावरील उपाय या संस्कृतीत आढळतात. ही प्रथा सार्वत्रिक असली तरी उपाय किंवा तोडगे स्थानिक पद्धतीने केले जातात. विविध प्रकारच्या नृत्यातून परंपरा आणि संस्कृती यांचे विलोभनीय दर्शन घडते. उदाहरणार्थ - फुगडीनृत्य, धालानृत्य ही स्त्रियांची नृत्ये, तर टिपरी, गोफ, गजेनृत्य. जाखडी, रोंबाट ही पुरुषांची नृत्ये परंपरेने केली जातात.

दक्षिण कोकणातील लोकगीते इथल्या संस्कृतीचे एक महत्त्वपूर्ण अंग असलेले दिसते. सांस्कृतिक परंपरांचे चित्र या लोकगीतांतून पहावयास मिळते. ओवी गीते, फुगडी, लग्नगीते, पुरुषांची खेळगीते, घाला, जन्मविधी या संबंधीची गीते पांगूळ, घनगर इत्यादींची गीते, बालगीते असे लोकगीतांचे अनेक प्रकार आहेत. मनोरंजन, श्रमपरिहार, धार्मिकविधी, नीतिबोध, उपासना या गीतप्रकारात वैविध्य असलेले दिसते. स्त्रीगीते आणि पुरुषांची गीते असे या गीतांचे विभाजन करता येते.

कोकणात मालवणी मुलुखातील दैवतकथांत एक समान सूत्र सापडते ते म्हणजे गाईनी पान्हा सोडलेल्या ठिकाणीच दैवते (स्वयंभू पाषाण) मिळाली व त्याप्रमाणे ती अग्रक्रमाने मुख्य देवतांची ठाणी झाली. मी जगण्यापेक्षा आपल्या पर्यावरणातील सर्व जगले पाहिजेत हि समूह भावना सामाजिक जीवनात आली. त्यामुळे देवचारांची व चाळ्यांची झाडे तोडू नयेत. देवाची वाहने नाग, कासव, नंदी, घोडा यांचे संरक्षण झाले पाहिजे. देवांच्या देवराया सुरक्षित राहाव्यात. गांधील माशांची पोळी यांचे संवर्धन होऊन परकीय आक्रमणाच्या वेळी लाखो गांधिलमाशांनी गावांचे संरक्षण केले आहे असे सांगून त्यांचेही रक्षण येथील समाजाने केले आहे. देव देवचाराची वाट स्वच्छ केली पाहिजे या स्वच्छतेमुळे रोगराई, रोगाच्या साथी उद्‌भवण्याचा प्रसंग नसे. ग्रामदेवतेत आलेली खांबकाठी म्हणजे भक्त प्रल्हादाच्या खांबातील देव ही संकल्पना आकाराला आली. देवशक्तीचा संचार अस्तित्व खांबखाठीत असते या भावनेतून खांबकाठी ही तरंग देवता मानली गेली. काही गावात देवतांची लाकडी पाषाणे असल्याने त्या लाकडाचा वापर खाजगी जीवनात केला जात नाही. नैतिक जीवन हेच सर्वश्रेष्ठ आहे. ही कल्पना 'न्याय नीती व धर्म' या तत्त्वात स्विकारली जावून नैतिकतेचा वस्तुपाठच ग्रामदैवते बनली. बारा बलुतेदारांची एकसंघता म्हणजे ग्रामदैवत व्यवस्था होय. दैवी शक्ती, दैवी दृष्टी, बळी देणे, या सामाजिक समजुतींचे दर्शन ग्रामदैवत लोकसंस्कृतीतून घडते. थोडक्यात असे म्हणता येईल की कोकणातील लोकसंस्कृतीला जे वेगळेपण प्राप्त झालेले आहे, त्यात ग्रामदैवतांचा फार मोठा वाटा आहे. कोकणातील ग्रामदैवत लोकसंस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे येथील माणसांचा देवदेवतांशी असलेला भक्तीभाव किंवा पूजाअर्चा इतका मर्यादित नाही.त्यांच्याशी तो बोलतो, चालतो, भांडतो, घाबरतो, शरण जातो. देव गुरांढोरांचे रक्षण करतो. चोरी, लबाडी करणा-याला शासन करतो.एकूण त्याचा देव त्याच्या दैनंदिन जीवनात केंद्रस्थानी वावरत असतो. ही सारी भूमी, सारी माती देवाची, ही त्याच्या मनाची खात्री आहे म्हणूनच तो आपल्या भूमीला देवभूमी म्हणतो आणि मानतोही.

मालवणी बोलीत देवदेवतांना अनेक प्रकारची गा-हाणी घातली जातात. देवतेला कौल लावणे, आशीर्वाद मागणे, करूणा भाकणे इत्यादी प्रसंगी गा-

हाणी घातली जातात. देवतांना आवाहन करणे आणि अशुभनिवारणासाठी आर्जव करणे हे गा-हाण्यांचे मुख्य उद्देश असतात. या गा-हाण्यांतून इथल्या माणसांची सामूहिक मानसिकता लक्षात येते. या मुलुखात गा-हाण्यात येणारे देवतांचे मूळ स्वरुप एकच असले तरी त्याची नावे वेगवेगळी आहेत. फक्त रवळनाथ, गांगो, दांडेकार, खुनी, निर्वंशिक, बाराचा पूर्वस, पूर्वसंमंध, नीत, बाराचा चव्हाटा व बाराचा मांड हे शब्दप्रयोग सर्व गावरहाटीत एकसारखेच वापरले जातात. परंतु मुख्य देवता आणि देवींची नावे मात्र वेगवेगळी असतात. या मुलुखातील मुख्य समाजपुरुषाने गावाची व समाजाची रचना करताना समाजव्यवस्थेतील बारा बलुतेदाराना माणुसकीचा धर्म सांगून कसे जगायचे हे ज्ञान दिले इतकेच नव्हे तर गावरहाटीत मानाचे पद दिले. या मुलुखात त्यामुळेच सत्ता, संपत्ती या बळावर कोणी वरचढ होऊ शकला नाही. तसेच कुलापासून ते ग्रामदेवतेच्या शक्तीती ओळख करुन दिल्यानेच या मुलुखात गा-हाण्यात सर्व घटक सामावलेले नाही तर एका अज्ञात व्यवस्थेल शरण जावून, मनोगत सांगून आचरण करणे वास्तविक जीवनाला सामोरे जाणे हिच गा-हाण्याच्या विविध प्रकारची लोकसंस्कृती आहे.

ताणतणावाच्या जीवनात ताजेतवाने वाटण्यासाठी आपल्या संस्कृतीने धर्म, संस्कृती, समाज या संघटनासाठी धर्म व मनोरंजन लोकसंस्कृती निर्माण केली, त्यात लोककलांचा समावेश करावा लागतो. कोणत्याच लोककलांची निर्मिती कलेसाठी झालेली नाही. मात्र लोककला या जगण्याचा अतूट भाग झालेल्या आहेत. लोककलानी समूहमनात आपुलकीचे नाते दृढ केलेले आहे. तसेच. देशकालपरिस्थितीनुसार एक प्रसारमाध्यम म्हणून या लोककलांचा फार मोठ्या प्रमाणात कृतीशील सहभाग असतो. प्रेक्षक व श्रोतृसापेक्ष सादर करावयाच्या लोककला आपले स्वतःचे वेगळेपण राखून असतात. धार्मिक श्रद्धा, परिसर आणि लोकसमूहाच्या सौंदर्यजाणीवा व भाषा अभिव्यक्तिची ताकद यावरच लोककलेचे सामर्थ्य असते. दशावताराची इतिहासपरंपरा लक्षात घेतली तर या लोककलानी स्वतंत्र लोकरंगभूमीची बांधणी झालेली आहे. याबबत गंगाधर मोरजे म्हणतात,' आजही दशावतार सादर करणारे कलाकार प्रामुख्याने विधीनाट्यांतूण आलेला आहे. याउलट चित्रकथी, पिंगळी, नंदीबैल म्हणजे लोकसंस्कृतीचे आपापल्या परीने सातत्य टिकवणाऱ्या लोकसमूहपेक्षा पारंपरिक संस्था होत. नाट्य किंवा नक्कल, बतावणीपेक्षा या संस्थांचा लोकांपर्यंत माहिती पोहचविण्याचा प्रयत्न असतो.

रामायण, महाभारत, पुराणे, मिथके, इतिहास या सांस्कृतिक इतिहासातील विविध टप्प्यातील जीवनशैलीच्या खुणा लोककलांमध्ये आढळतात. लळितातील भटजी, गावकार यांची पात्रे गावगाड्यातील प्रशासन व्यवहाराच्या व्यवस्थेची प्रतिक आहेत. भटाभिक्षुकांकडून होणारे धार्मिक शोषण, शेठ सावकारांकडील आर्थिक शोषण, राजसत्तेने केलेला जुलूम, पुढा-याचा भ्रष्टाचार, याबद्दल समाजमनात असलेला संताप आणि चिड या लौकिक सोंगाच्या माध्यमातून, विडंबनाच्या माध्यमातून व्यक्त होते. लोकमानसातील असंतोष आणि संताप यात विडंबन साधून व्यक्त केला जातो. ज्ञानसत्ता, अर्थसत्ता आणि राजसत्ता याविषयीची टीकाभाष्ये करण्याचे एक खुले व्यासपीठ म्हणून लोकरंगभूमी कार्य करते. रामायण-महाभारतादि काव्ये, पुराणकथा, संताचे साहित्य या सर्वाच्या संचिताचा वारसा आपल्याला ला लोककलांमधून दिसतो. मालवणी मुलुखात सादर होणाऱ्या लोककलांमधून देव-दानव, भले-बुरे, खरे-खोटे, स्थानिक-परके असा व त्यातील सांस्कृतिक संघर्ष सतत येत राहतो. लोककलातील या आविष्कारामुळे नैतिक जीवनव्यवहाराचा वस्तुपाठ या लोककला देतात. दशावतार कलाकार एकत्र जेवतात. मालकापासून गडीमाणसांपर्यंत जेवण एकत्र असते. एकत्र चर्चा करतात, कथानक ठरवतात यातून सांघिक एकता दिसून येतो. तसेच सर्व गाव एकत्र येऊन याचे आयोजन करत असल्याने समूहएकता ही लोकसंस्कृती चालत आलेली दिसून येते.

या भूमीचा विचार केला तर वेगवेगळ्या लोककलाप्रकारानी ही भूमी व्यापलेली आहे दशावतार, चित्रकथी, लळित, कळसूत्री बाहुल्या, पांगुळ, गोफ, शिमगोत्सवातील खेळे, घुमटावरची गीते, कीर्तन, डबलबारी भजने इत्यादी प्रयोगात्म लोककला पहावयास मिळतात. या लोककला कधी निखळ मनोरंजनाच्या उद्देशाने सादर केल्या जातात, तर कधी धर्मविधीचा भाग म्हणूनही सादर केल्या जातात. या लोककला सामाजिक सांस्कृतिक अवस्थेचा निदर्शक असा आरसा म्हणता येईल. सांस्कृतिक विकासक्रमाच्या आद्यखुणा व त्यातील स्थित्यंतराचे दर्शन या लोककलामधून स्पष्टपणे दिसते. मालवणी मुलुखात प्रत्येक गावात ग्रामदैवते आहेत. त्यांच्या नावाने विशिष्ठ दिवशी वार्षिक महोत्सव होतात या महोत्स्वावात सर्वोच्च स्थान म्हणजे जत्रा किंवा

दहिकाला उत्सव होय. या दहिकाल्यात होणारे दशावतारी नाटक ही एक रात्रभर पुरणारी, निखळ करमणूक होय. या उत्सवात सारा गाव एक होतो. गावचे देऊळ सारवले, सजवले जाते, पताका लावल्या जातात, मंडप उभारतात आता गावोगावी लाईटची सोय आहे. विज नसेल त्या ठिकाणी पेट्रोमॅक्स लावण्यासाठी एक शीग. वर्गणी जास्त घेवा पण आख्यान बरा लावक व्हया असा गावकरी तावातावात बोलेल, कारण याचा कर्ता तो असतो व नाटकासाठी पैपाहुणे, पंचक्रोशीतील लोक येणारे असतात. दशावतारी खेळ झाला नाही असा एकही गाव या मुलखात सापडणार नाही. यात तथ्य आहे कारण या निसर्गसंपन्न भूमीला रंगदेवता प्रसन्न आहे.

"दक्षिण कोकणातील प्रत्येक ग्रामदेवतेची दशावतार मंडळी ठरलेली असते. या जत्रोत्सवात दशावतार हे मुख्य आकर्षण असले तरी काळोखाबरोबर एकच गजबज उडते. मंदिरात मानकरी 'गाऱ्हाणी' सनातन पद्धतीने घालित असतात. देवासमोर ओटीचे नारळ, तांदूळ, खण, केळी, पेढे, अगरबत्ती यांचा ढीग साचतो. मग देवीची पालखी निघते. ढोल, तासे, वाजंत्र्यांच्या गजरात देवाचे 'तरंग' देवळाभोवती प्रदक्षिणा घालतात. जत्रेतली गर्दी तेव्हा पालखीसोबत फिरु लागते."[५] पंचक्रोशीतील तमाम गावकरी मंडळी, नातेवाईक, सासुरवाशीणी या महोत्सवात एकत्र आलेली असतात. हा लोकसमूहाचा उत्सवच दशावतार या लोककलेशी जोडलेल्या या मुलुखातील लोकजीवनाचा हा अविभाज्य भाग आहे.

कोकणातील लोककला दशावतारी लोकनाट्य हे उत्स्फूर्त 'संवाद करणारे नाट्य' म्हणून प्रचलित आहे. वेशभूषा, केशभूषा, रंगभूषा आणि संवादफेक हेच खरे दशावताराचे आत्मतत्व होय. झांजेचा झनझनाट सुरु झाला की प्रेक्षक खेळाशी एकरुप होऊ लागतात. " 'जैसी गजवदनाची येणे भक्ति केली साची . . . . तक या थयSS था . . . हे जिताम था SS थय थय था SS . . . ची आवर्तने एक वेगळीच लय निर्माण करतात."[६] वाद्यमेळ त्रिनादतो त्याप्रमाणे गाण्याच्या तालावर एक-एक पात्र रंगपीठावार येत राहते. पूर्वरंगात महत्त्वाचे पात्र म्हणजे संकासूर. देवदेवतांचे विडंबन करणारा व सामाजिक अगावर भाष्य कराणारा हा संकासूर दशावतार नाटकाचा आत्माच होय. तो शंका-कुशंका उपस्थित करतो आणि उपायही तोच सुचवतो. नाट्य खुलवतो, फुलवतो आणि रसिकाना हसवत ठेवतो. प्रेक्षकांशी संवाद साधून त्यानाही नाट्यात सामिल करुन घेतो. 'केला तुका झाला माका . . . आमचा ता तुमचा, तुमचा ता आमचा . . . ' या सर्व मनोरंजनात संकासूर बहुजन समाजाची प्रतिनिधी बनून म्हणींचा बोलीभाषेचा अप्रतिम वापर करतो. अशा वेळी त्या टीचभर रंगमंचावर लोकसमूह प्रत्यक्ष जगत असतो, आत्ममग्न होत असतो. उत्स्फूर्तपणे सगळा समूहच निर्माता, तोच आस्वादक आणि तोच परंपरेचा रक्षक ठरतो. एवढे होईपर्यंत २ वाजलेले असतात व त्यानंतर मुख्य आख्यानाला सुरुवात होते. झांजावाला, नाल-चक्कीवाला मधला काळ अप्रतिम वाजप करुन मनोरंजन करतात आणि मुख्य कथानकाला सुरुवात होते. हरिश्चंद्र तारामती, रामायण, महाभारत, सती सांगुणा अशी आख्याने लावली जातात. सती चांगुणा हा खेळ असेल तर चिलयाबाळाचे शिर उखळात घालून कांडताना चांगुणा रडत रडत गाणे गाऊ लागली की सारे पेक्षक व्याकुळ होतात. बायका हमसाहमसी रडू लागतात, हरिश्चंद्र तारामतीच्या खेळात हरिश्चंद्राचे हाल बघून गलबलतात. राम वनवासाला गेल्यावर जेव्हा हनुमान प्रेक्षकांत हिंडून 'हे वृक्षानो, माझ्या रामासाठी तुमची सावली द्या, फळे द्या' म्हणून हात पसरतो तेव्हा आपल्याजवळ असलेले लाडू वैगरे प्रेक्षक उत्स्फूर्तपणे देतात. भिक्षेच्या रुपात लाडू, भजी, खाजे, पैसे, उत्स्फूर्तपणे देतात. कलावंतांचा असा हा जिता जागता अभिनय आणि तो अनुभव घेणारा समुदाय या खेळात सर्व संवेदनासहीत सहभागी होतो. त्या पात्राबरोबर हसतो, रडतो आणि स्वतःच एक कलावंतच बनतो. त्याच्या भावनांचे शुध्दीकरण होते. यावरुन असे म्हणता येते की येथील लोकसंस्कृतीच्या संस्कारामुळेच माणूसपणाचा खळाळता झरा अखंड माणूसपणाने वाहतो आहे, अशा प्रकारे, कोकणातील लोकसंस्कृतीचे स्वरूप विविधांगी असलेले दिसून येते.

## संदर्भ

१) काजरेकर गोविंद, कोकणातील कृषीसंस्कृती आणि लोकगिते पृ. २१.
२) तत्रैव पृ. ९
३) नामदेव गवळी, मालवणी मुलुखातील लोकसाहित्य व लोकसंस्कृती, पृ. ५४२.
४) मधु मंगेश कर्णिक, माझा गाव माझा मुलुख, पृ. १६१
५) नामदेव गवळी, मालवणी मुलुखातील लोकसाहित्य व लोकसंस्कृती, पृ. ४४१.